साप्ताहिक
www.utkrantkokan.in
सत्य, समता आणि संघर्षाची भाषा...
उत्क्रांत कोकण
कोकणची बातमी...कोकणच्या माणसांसाठी...
RNI No. : MHMAR/26/A3623
मालक, संपादक: उत्तम रा.पवार | वर्ष १ ले, अंक ०२ | रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६ | पाने ६ | मूल्य - रु.५.००

दोन हजारांवरील UPI व्यापारी व्यवहारांवर आता ०.४ टक्के शुल्क लागू होणार

नवी दिल्ली : डिजिटल व्यवहारांसाठी मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या यूपीआयच्या शुल्करचनेत बदल करण्यात आला आहे. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने (एनपीसीआय) व्यापारी व्यवहारांसाठी नवा व्यापारी सवलत दर जाहीर केला आहे. त्यानुसार १५ ऑक्टोबरपासून दोन हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कमेच्या ग्राहक ते व्यापारी यूपीआय व्यवहारांवर ०.४ टक्के शुल्क लागू होणार आहे. मात्र, व्यक्ती ते व्यक्ती होणारे यूपीआय व्यवहार कोणत्याही रक्कमेचे असले तरी यापुढेही पूर्णपणे मोफत राहणार आहेत.

नव्या नियमाचा थेट परिणाम दुकानदार, व्यापारी आणि सेवा पुरवठादारांकडून स्वीकारल्या जाणाऱ्या मोठ्या रक्कमेच्या यूपीआय व्यवहारांवर होणार आहे. दोन हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कमेच्या ग्राहक ते व्यापारी व्यवहारांवर आकारले जाणारे ०.४ टक्के शुल्क हे संबंधित पेमेंट प्रणालीतील बँका, पेमेंट सेवा पुरवठादार आणि यूपीआय अनुप्रयोग पुरवठादार यांच्यात विभागले जाणार आहे.

शासकीय वसतिगृहांमध्ये मोफत प्रवेशासाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत

रत्नागिरी (जिमाका) : जिल्ह्यात सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत असलेल्या १० शासकीय वसतिगृहांमध्ये सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील मोफत प्रवेशासाठी प्रक्रिया सुरू झाली आहे. अनुसूचित जाती तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी ३० सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त शीतल सोनटक्के यांनी केले आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात मुलांसाठी ६ आणि मुलींसाठी ४ अशी एकूण १० शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. या वसतिगृहांमध्ये व्यावसायिक महाविद्यालयीन अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेले विद्यार्थी ऑनलाईन अर्ज करू शकतात. पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी https://hmasnew.mahait.org या संकेतस्थळावर जाऊन आपला अर्ज मुदतीत सादर करावयाचा आहे.

प्रवेशासाठी महत्त्वाच्या अटी व पात्रता: १) विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक आहे. २) व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अर्ज केलेला असणे बंधनकारक आहे. ३) विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाखांपर्यंत आवश्यक राहील. ४) वसतिगृहातील प्रवेश पूर्णपणे गुणवत्तेनुसार दिले जातील.

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरताना आपली वैयक्तिक व शैक्षणिक माहिती अचूक भरावी तसेच आवश्यक ती सर्व कागदपत्रे वेळेत अपलोड करावीत. अर्ज सादर करण्यापूर्वी सर्व माहितीची काटेकोर पडताळणी करूनच अर्ज अंतिम (सबमिट) करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रवेश प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी संबंधित शासकीय वसतिगृहाचे गृहपाल अथवा सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, रत्नागिरी यांच्याशी संपर्क साधावा.



लोकशाहीचा चौथा स्तंभ....

संपादकीय

पण सामान्य माणसाचा आवाज कुठे ?

बातमी प्रश्न विचारणारी, व्यवस्था जागी करणारी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांना शब्द देणारी असावी!

लोकशाही म्हणजे केवळ मतदानाचा दिवस नाही. लोकशाही म्हणजे प्रत्येक नागरिकाला आपले मत मांडण्याचा, प्रश्न विचारण्याचा आणि आपल्या हक्कांसाठी आवाज उठवण्याचा अधिकार. या लोकशाही व्यवस्थेचे रक्षण करणाऱ्या प्रमुख आधारस्तंभांमध्ये प्रसारमाध्यमांना **'लोकशाहीचा चौथा स्तंभ'** म्हणून महत्त्वाचे स्थान दिले जाते. कारण सत्ता कोणाचीही असो, प्रशासन कोणतेही असो; त्यांच्यावर प्रश्न विचारण्याचे आणि जनतेसमोर वास्तव मांडण्याचे काम माध्यमांकडून अपेक्षित असते.

पण आज एक प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे- या चौथ्या स्तंभाच्या सावलीत सामान्य माणूस नेमका कुठे उभा आहे ?

मोठ्या घटना घडल्या की माध्यमांचे लक्ष तिकडे जाते. मोठी व्यक्ती बोलली की तिचे वक्तव्य प्रसिद्ध होते. राजकीय आरोप-प्रत्यारोपांना मोठी जागा मिळते. प्रसिद्ध व्यक्तींच्या कार्यक्रमांना प्रसिद्धी मिळते. अर्थात हेही वृत्तपत्राचे कामच आहे. मात्र त्याच वेळी गावातील एखादा नागरिक महिनोन्महिने पाण्यासाठी धडपडत असेल, एखाद्या रुग्णाला रुग्णालयापर्यंत पोहोचण्यासाठी खराब रस्त्याशी झुंज द्यावी लागत असेल किंवा एखाद्या छोट्या गावाचा प्रश्न वारंवार मांडूनही त्याकडे दुर्लक्ष होत असेल तर त्या प्रश्नाला आवाज कोण देणार ?

याच ठिकाणी लोकाभिमुख पत्रकारितेची खरी परीक्षा सुरू होते. पत्रकारितेचे काम केवळ काय घडले ? एवढे सांगणे नाही. त्यासोबत का घडले ? याला जबाबदार कोण ?, यावर उपाय काय ? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे याचा सामान्य माणसावर काय परिणाम होतो ? हे प्रश्नही विचारणे आवश्यक आहे.

आज सोशल मीडियामुळे प्रत्येकाच्या हातात कॅमेरा आला आहे. एखादा प्रश्न काही मिनिटांत हजारो लोकांपर्यंत पोहोचू शकतो. एखादा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर प्रशासन त्याची दखल घेते, ही परिस्थिती अनेकदा दिसून येते. मात्र प्रत्येकाला सोशल मीडिया वापरता येतोच असे नाही. अशा वेळी माध्यमांनीच त्या माणसापर्यंत पोहोचणे आवश्यक ठरते.

विशेषतःग्रामीण भागात ही जबाबदारी अधिक मोठी आहे. शहरातील मोठ्या प्रश्नांना अनेक माध्यमांचे लक्ष मिळते; मात्र दुर्गम गावातील रस्ता, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण, एसटी सेवा, शासकीय कार्यालयातील अडचणी किंवा शेतकऱ्यांच्या समस्या अनेकदा स्थानिक पातळीवरच अडकून राहतात. म्हणूनच स्थानिक पत्रकारिता ही केवळ छोट्या बातम्यांची पत्रकारिता नाही; ती लोकशाहीला तळागाळाशी जोडणारी महत्त्वाची कडी आहे.

आज माध्यमांसमोर अनेक आव्हाने आहेत. जाहिरातीचे आर्थिक गणित, वाढती स्पर्धा, सोशल मीडियाचा वेग या सगळ्यांमध्ये पत्रकारितेची मूलभूत मूल्ये टिकवणे ही मोठी जबाबदारी आहे. याच पार्श्वभूमीवर एक गोष्ट सांगावीशी वाटते - ज्याचा आवाज आधीच मोठा आहे, त्याची बातमी सर्वांपर्यंत पोहोचवणे सोपे असते. पण ज्याचा आवाज कुणापर्यंत पोहोचत नाही, त्याचा आवाज समाजासमोर मांडणे हीच लोकाभिमुख पत्रकारितेची खरी कसोटी आहे. **साप्ताहिक 'उत्क्रांत कोकण'**ची वाटचाल याच विचारातून व्हावी, ही भूमिका आहे.

एखाद्या गावातील छोटासा प्रश्न उद्या मोठ्या सामाजिक बदलाची सुरुवात ठरू शकतो. एखाद्या सामान्य नागरिकाची तक्रार एखाद्या व्यवस्थेतील त्रुटी समोर आणू शकते. आणि एखादी निर्भीड बातमी प्रशासनाला योग्य निर्णय घेण्यास प्रवृत्त करू शकते.

लोकशाहीचा चौथा स्तंभ मजबूत हवा असेल, तर त्याचा पाया सामान्य माणसाच्या विश्वासावरच मजबूत करावा लागेल. कारण लोकशाहीचा खरा चेहरा सत्तेच्या दालनात नव्हे, तर सामान्य माणसाच्या आयुष्यात दिसतो.

जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने 'लोकसंवाद'

रत्नागिरी (जिमाका): जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने आयोजित 'लोकसंवाद-२०२६' कार्यक्रमांतर्गत येथील टिळकअळी गणेशोत्सव मंडळ येथे रोजगार विषयक विशेष संवाद पार पडला. यावेळी कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे सहाय्यक आयुक्त दत्ता चव्हाण यांनी जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगारांसाठी आयोजित केल्या जाणाऱ्या महारोजगार मेळाव्यांची सविस्तर माहिती दिली.

पंतप्रधानांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राज्यभरात ५०० हून अधिक रोजगार मेळाव्यांचे नियोजन करण्यात आले असून, या मोहिमेचा भाग म्हणून जिल्ह्यात एकाच दिवशी म्हणजेच २९ सप्टेंबर रोजी १२ विविध ठिकाणी हे मेळावे आयोजित केले जाणार आहेत. सुशिक्षित तरूण-तरुणींना थेट नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे आणि एकाच छताखाली नोकरी शोधणारे, उद्योजक व शैक्षणिक संस्था यांना एकत्र आणणे हा यामागचा मुख्य उद्देश असल्याचे चव्हाण म्हणाले.

जिल्ह्यात २९ सप्टेंबरला १२ ठिकाणी महारोजगार मेळावे

जिल्ह्यातील मेळाव्यांची ठिकाणे :

रत्नागिरी : गोगटे जोगळेकर महाविद्यालय आणि शिरगाव येथील मत्स्य महाविद्यालय.

मंडणगड : लोकनेते गोपीनाथजी मुंडे महाविद्यालय.

दापोली : कृषी विद्यापीठ.

खेड : ज्ञानदीप विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय तसेच शिवतेज आरोग्य सोसायटी हॉल.

गुहागर : शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI).

चिपळूण : खेर्डी-तळशिर येथील सती शाळा.

लांजा : कल्पना कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट.

संगमेश्वर : देवरूख येथील डीकॅड कॉलेज आणि राजेंद्र माने अभियांत्रिकी महाविद्यालय.

राजापूर : राजापूर हायस्कूल.

मेळाव्याचा लाभ घेण्यासाठी तरुणांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे. उमेदवारांची नोंदणी, उद्योजकांसाठी नोंदणी आणि शासकीय योजनांची माहिती देणारा अधिकृत व्हॉट्सअॅप ग्रुप, या तिन्हींसाठी विशेष 'क्यूआर कोड' मंडळाचे अध्यक्षांकडे सोपवण्यात आले आहेत. जिल्ह्यातील गरजू व सुशिक्षित तरुणांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन चव्हाण यांनी केले. सुरुवातीला जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत सातपुते यांनी प्रास्ताविक करून लोकसंवाद या कार्यक्रमाविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली.

यावेळी मंडळाचे अध्यक्ष शशिकांत काळे, सचिव मंदार खेर, उत्सव सचिव उपेंद्र खेर, विश्वस्त प्रभाकर करमरकर, अरूण करमरकर, कौशल्य विकास अधिकारी मोरेश्वर दुधाळ आदींसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्राथमिक शिक्षक प्रभू रघुनाथ हंबर्डे यांना जिल्हास्तरीय 'आदर्श शिक्षक पुरस्कार' जाहीर

गुहागर (विशेष प्रतिनिधी): जिल्हा परिषद रत्नागिरीच्या शिक्षण विभागामार्फत सन २०२६–२७ या शैक्षणिक वर्षासाठी देण्यात येणाऱ्या मानाच्या जिल्हा परिषद आदर्श शिक्षक पुरस्काराची घोषणा करण्यात आली असून, यामध्ये गुहागर तालुक्यातील जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक आदर्श शाळा वेलदूर घरटवाडी येथील उपशिक्षक प्रभू रघुनाथ हंबर्डे यांची निवड झाली आहे.

रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अस्मिता केंद्रे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी वैदेही रानडे यांच्या वतीने या पुरस्कारांची अधिकृत घोषणा करण्यात आली. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांनी या निवडीला अंतिम मान्यता दिली असल्याची माहिती जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी मनीषा जगदाळे यांनी दिली आहे.

प्रभू हंबर्डे यांनी शिक्षण क्षेत्रात दिलेले मोलाचे योगदान, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले विशेष प्रयत्न आणि त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

सध्या ते जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक आदर्श शाळा वेलदूर घरटवाडी, (ता. गुहागर) येथे उपशिक्षक म्हणून निष्ठापूर्वक सेवा बजावत आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे वेलदूर परिसरात तसेच संपूर्ण गुहागर तालुक्यात आनंदाचे वातावरण पसरले असून, शिक्षण क्षेत्रातून व सर्वस्तरातून प्रभू हंबर्डे सर यांच्यावर अभिनंदन आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

रत्नागिरीत दोघांकडून अंमली पदार्थ जप्त

रत्नागिरी (प्रतिनिधी): शहरात अमली पदार्थांच्या विक्रीला आळा घालण्यासाठी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने (एलसीबी) धडक कारवाई सुरू केली आहे. सलग दोन कारवायांमध्ये पोलिसांनी दोघांना ताब्यात घेत ब्राऊन हेरॉईनसदृश अमली पदार्थासह मुद्देमाल जप्त केला.

मारुती मंदिर परिसरातील क्रीडांगणाजवळ शुक्रवारी (ता. १२) रात्री सुमारे ११वाजता एलसीबीच्या पथकाने कारवाई केली. यावेळी अलमुहीब असगर सोलकर (वय ३०, रा. कर्ला, ता. जि. रत्नागिरी) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून ५२ पुड्यांमध्ये असलेले २.५ ग्रॅम निव्वळ वजनाचे, २६ हजार रुपये किमतीचे ब्राऊन हेरॉईनसदृश अमली पदार्थ तसेच २० हजार रुपये किमतीचा मोबाईल असा एकूण ४६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी हवालदार गणेश राजेंद्र सावंत यांनी तक्रार दिली.

त्यानंतर रविवारी (ता. १३) मध्यरात्री एलसीबीच्या पथकाने निवखोल येथील लाला कॉम्प्लेक्स परिसरात कारवाई केली. विजेच्या खांबाजवळ थांबलेल्या तनवीर युसूफ मुल्ला (वय ५२, रा. राजिवडा, रत्नागिरी) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून सुमारे ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी हवालदार विनोद विश्राम कदम यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अमली पदार्थांचा पुरवठा कुठून?

काही तासांच्या अंतरात झालेल्या या सलग कारवायांमुळे रत्नागिरी शहरातील अमली पदार्थांच्या विक्रीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. पोलिसांच्या कारवाईत किरकोळ विक्रेते किंवा संशयित ताब्यात येत असले, तरी हे अमली पदार्थ शहरात नेमके कुठून येतात आणि त्यामागील मुख्य सूत्रधार कोण? याचा तपास होणे महत्त्वाचे ठरणार आहे.

एलसीबीच्या या कारवायांमुळे अमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, पुढील तपासात या नेटवर्कमागील मोठी साखळी उघड होते का, याकडे लक्ष लागले आहे.

मात्र इतक्या कारवाया होत असूनही अमली पदार्थांची विक्री सुरुच असून याला आळा घालण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर असल्याचे दिसून येते.

विचारमंच

– संजय गमरे, गुहागर

कोकणाबाहेरील प्रशासकीय अधिकाऱ्यांवरच किती काळ अवलंबून राहणार ?

नुकताच गुहागर पंचायत समितीच्या वतीने इयत्ता चौथी, पाचवी, सातवी आणि आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. या परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करणे ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे. कारण शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवणे ही सहजसाध्य गोष्ट नाही. त्यामागे विद्यार्थ्यांची अनेक वर्षांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य असते.मात्र, अशा गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराकडे केवळ एक औपचारिक कार्यक्रम म्हणून पाहणे योग्य ठरेल का? हा प्रश्न या निमित्ताने उपस्थित करावासा वाटतो.

एखादा विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत येतो, तेव्हा तो केवळ एका परीक्षेत यशस्वी झालेला नसतो. त्याच्यामध्ये सातत्य, अभ्यासाची सवय, स्पर्धेची जाणीव, मेहनत करण्याची वृत्ती आणि भविष्यात काहीतरी वेगळे करण्याची क्षमता निर्माण झालेली असते. अशा विद्यार्थ्यांच्या यशाकडे भविष्यातील मोठ्या शक्यतांचा प्रारंभ म्हणून पाहिले पाहिजे. मात्र, विद्यार्थ्यांचा गौरव केवळ पुष्पगुच्छ, प्रमाणपत्र किंवा सत्कारापुरता मर्यादित राहिला, तर त्यातून आपण नेमके काय साध्य करणार आहोत? कोकणाला गुणवंत विद्यार्थ्यांची कमतरता नाही; प्रश्न आहे तो त्या गुणवत्तेला योग्य दिशा देण्याचा.

आज कोकणातील अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांत यश मिळवत आहेत. शिक्षण, वैद्यकीय क्षेत्र, अभियांत्रिकी, संरक्षण, उद्योग, कला, क्रीडा अशा अनेक क्षेत्रांत कोकणातील तरुण आपली गुणवत्ता सिद्ध करत आहेत. मग प्रशासकीय सेवेत कोकणातील विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढवण्यासाठी आपण दीर्घकालीन प्रयत्न का करू नयेत?

कोकणातील अनेक सरकारी कार्यालयांमध्ये बाहेरून आलेले अधिकारी आणि कर्मचारी सेवा बजावताना दिसतात. एखादा अधिकारी किंवा शिक्षक बाहेरून आला म्हणून तो कोकणाच्या विकासाचा विचार करणार नाही, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. प्रत्येक अधिकारी आपापल्या परीने सेवा बजावत असतो. मात्र, स्थानिक परिस्थिती, भौगोलिक वैशिष्ट्ये, सामाजिक रचना, स्थानिक प्रश्न आणि लोकांच्या गरजा यांची दीर्घकालीन जाण असलेला स्थानिक प्रशासकीय वर्ग निर्माण करणे, ही मात्र कोकणासाठी महत्त्वाची गरज आहे. कारण स्थानिक भूमीशी नाते असलेला अधिकारी केवळ पदावर काम करणारा अधिकारी नसतो; तो त्या समाजाच्या भविष्यातील प्रश्नांकडे वेगळ्या दृष्टीने पाहू शकतो.

गुणवंत विद्यार्थी आहेत; मग प्रशासकीय अधिकारी का नाहीत? हा प्रश्न आपण स्वत:ला विचारायला हवा.

शिष्यवृत्ती परीक्षेतील यश हा या प्रश्नाचा एक छोटासा धागा आहे. आज इयत्ता चौथीतील एखादा विद्यार्थी गुणवत्ता यादीत येतो. त्याच्यामध्ये अभ्यासाची चांगली क्षमता आहे. त्याला योग्य वेळी मार्गदर्शन मिळाले, स्पर्धा परीक्षांची ओळख झाली, योग्य वातावरण मिळाले आणि त्याच्या कुटुंबाला आवश्यक पाठबळ मिळाले, तर पुढील पंधरा–वीस वर्षांत तो प्रशासकीय सेवेत का जाऊ शकत नाही? पण त्यासाठी पहिलीपासूनच एक दीर्घकालीन शैक्षणिक दृष्टी आवश्यक आहे.

इयत्ता पहिलीत प्रवेश घेणारा विद्यार्थी साधारणपणे पुढील अनेक वर्षे शिक्षण घेतो. उच्च शिक्षणानंतर स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठीही वेळ लागतो. प्रशासकीय सेवा ही एका वर्षात किंवा एका निवडणूक कालावधीत घडणारी गोष्ट नाही. हा दीर्घकालीन प्रवास आहे. म्हणूनच कोकणात प्रशासकीय अधिकारी घडविणे हा एखाद्या कार्यक्रमाचा विषय नसून एक दीर्घकालीन प्रकल्प म्हणून पाहिला पाहिजे.

पाच वर्षांच्या राजकारणापलीकडे पंधरा–वीस वर्षांचा विचार हवा:

लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ पाच वर्षांचा असतो. प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या आणि बदल्यांचे चक्रही वेगवेगळे असते. त्यामुळे एखाद्या परिसरासाठी वीस वर्षांची शैक्षणिक किंवा प्रशासकीय दिशा ठरविणे आव्हानात्मक असते. पण आव्हानात्मक आहे म्हणून ते अशक्य नाही.

आजच्या इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांपैकी पुढील पंधरा–वीस वर्षांत कोण प्रशासकीय सेवेत जाईल, कोण संशोधक बनेल, कोण डॉक्टर किंवा अभियंता बनेल, कोण उद्योजक बनेल, याचा अंदाज आज घेता येणार नाही. मात्र त्यांच्यासाठी संधींचे दरवाजे आजच उघडता येतात. यासाठी शाळा, शिक्षक, पालक, स्थानिक स्वराज्य संस्था, शिक्षण विभाग आणि समाज या सर्वांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे.

शिष्यवृत्तीच्या पुढे स्पर्धा परीक्षेची दिशा :

शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना पुढील टप्प्यांसाठी मार्गदर्शन मिळायला हवे. त्यांच्या क्षमता ओळखून त्यांना विविध स्पर्धा परीक्षा, वाचन, सामान्यज्ञान, भाषिक कौशल्य, गणितीय क्षमता, तर्कशक्ती, लेखनकौशल्य आणि मुलाखतीच्या तयारीची प्राथमिक ओळख करून देता येईल. यासाठी प्रत्येक वेळी मोठ्या निधीची आवश्यकता असेलच असे नाही. स्थानिक पातळीवर 'प्रशासकीय सेवा मार्गदर्शन केंद्र', 'स्पर्धा परीक्षा वाचनालय', 'गुणवंत विद्यार्थी मार्गदर्शन उपक्रम', 'अधिकारी आपल्या भेटीला' अशा संकल्पना राबवता येतील.

कोकणातील प्रशासकीय सेवेत कार्यरत असलेले अधिकारी, निवृत्त अधिकारी, शिक्षक, प्राध्यापक आणि विविध क्षेत्रातील तज्ज्ञ यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला, तर त्यातून मोठी प्रेरणा निर्माण होऊ शकते.

सत्कारापेक्षा पुढचा प्रश्न महत्त्वाचा :

गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार जरूर व्हावा. त्यांना प्रमाणपत्रे मिळावीत. त्यांचे कौतुक व्हावे. पण त्याचबरोबर प्रत्येक सत्कार सोहळ्यात एक प्रश्नही विचारला पाहिजे – "या विद्यार्थ्यांच्या पुढील प्रवासासाठी आपण काय करणार आहोत?"

आज गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांचा फोटो काढला, त्यांचा सत्कार केला आणि कार्यक्रम संपला, तर त्या कार्यक्रमाची आठवण काही काळ राहील. पण त्याच विद्यार्थ्यांसाठी पुढील दहा वर्षांची दिशा आखली, तर त्याचा परिणाम एका पिढीवर होऊ शकतो. म्हणून सत्कार समारंभ हा शेवट नसून एका मोठ्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात असायला हवा.

कोकणाला स्वत:चा प्रशासकीय वर्ग निर्माण करावा लागेल :

कोकणातील विद्यार्थी गुणवंत नाहीत, असे म्हणण्याचे कोणतेही कारण नाही. प्रश्न त्यांच्या गुणवत्तेचा नसून त्या गुणवत्तेला योग्य संधी आणि दिशा मिळते का, हा आहे. आपण डॉक्टर, अभियंते, शिक्षक आणि विविध क्षेत्रांतील व्यावसायिक घडवतो. त्याचप्रमाणे प्रशासकीय अधिकारी घडविण्यासाठीही नियोजनबद्ध प्रयत्न केले पाहिजेत.

कोकणातील एखादा विद्यार्थी पुढे जाऊन प्रशासकीय सेवेत दाखल झाला आणि आपल्या प्रदेशातील प्रशासन, शिक्षण, रोजगार, पर्यटन, पर्यावरण, आरोग्य, वाहतूक, ग्रामीण विकास आणि स्थानिक अर्थव्यवस्थेच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहू लागला, तर त्याचा लाभ केवळ त्या विद्यार्थ्याला होणार नाही; संपूर्ण समाजाला होईल.

यासाठी बाहेरून आलेल्या अधिकाऱ्यांविषयी नकारात्मक भूमिका घेण्याची गरज नाही. उलट, स्थानिक आणि बाहेरील अशा दोन्ही प्रकारच्या अधिकाऱ्यांच्या अनुभवातून शिकत, कोकणातील तरुणांना प्रशासकीय सेवेत अधिकाधिक संधी मिळवून देणे हा सकारात्मक मार्ग आहे.

आता दीर्घकालीन नियोजनाची गरज :

कोकणाच्या विकासाचा विचार करताना केवळ रस्ते, इमारती, पाणी, वीज आणि इतर भौतिक सुविधा यांचाच विचार करून चालणार नाही. मानवी संसाधनाचा विकास हा त्याहून महत्त्वाचा विषय आहे. आजचा विद्यार्थी हा उद्याचा अधिकारी, शिक्षक, शास्त्रज्ञ, उद्योजक किंवा लोकप्रतिनिधी आहे. त्याच्यात गुंतवणूक केली तर त्याचा परिणाम पुढील पिढ्यांवर होतो. म्हणूनच कोकणातील प्रत्येक गुणवंत विद्यार्थ्याला एक प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे –

"तू मोठा होऊन काय होणार?"

आणि त्यानंतर समाजाने त्याला दुसरा प्रश्न विचारायला हवा –

"तू मोठा होण्यासाठी आम्ही तुझ्यासाठी काय करणार?"

गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार ही चांगली सुरुवात आहे. पण त्या सत्कारानंतर त्यांच्या स्वप्नांना दिशा देणारी व्यवस्था उभी करणे हे खरे काम आहे.

कोकणाने केवळ बाहेरून येणाऱ्या प्रशासनाकडे पाहत राहण्यापेक्षा आपल्या मातीतून प्रशासकीय अधिकारी, प्रशासकीय नेतृत्व आणि धोरणनिर्मिते घडविण्याचा संकल्प केला पाहिजे.

कारण कोकणाच्या भविष्यासाठी सर्वात मोठी गुंतवणूक रस्त्यांमध्ये किंवा इमारतींमध्ये नाही; ती कोकणातील मुलांच्या गुणवत्तेत, त्यांच्या स्वप्नांमध्ये आणि त्यांच्या शिक्षणात आहे.

"वाचकांच्या शब्दांत... उत्क्रांत कोकण"

शुभेच्छा संदेश...

विद्यार्थी मोठा होताना पाहणे, त्याच्या कर्तृत्वाची नवी उंची अनुभवणे आणि त्याच्या यशाचा आलेख उंचावताना पाहण्याचा आनंद घेणे, यापेक्षा माझ्या सारख्या शिक्षकासाठी दुसरा मोठा आनंद नाही.

माझा विद्यार्थी उत्तम पवार याने आपल्या कल्पकतेला, लेखनवृत्तीला आणि ध्येयवेड्या जिद्दीला कृतीची जोड देत "उत्क्रांत कोकण" नावाच्या डिजिटल साप्ताहिकाचा शुभारंभ केला आहे.

विशेष अभिमानाची बाब म्हणजे या साप्ताहिकाचा मालक, संपादक आणि प्रकाशक अशा तिन्ही जबाबदाऱ्या त्याने स्वत:च्या खांद्यावर घेतल्या आहेत. पहिल्या अंकाचे यशस्वी प्रकाशन ही त्याच्या नव्या वाटचालीची आश्वासक सुरुवात आहे.

पहिला अंक वाचला. हा अंक अतिशय चांगला आहे. यातील बातम्या, माहितीपर लेख अतिशय वाचनीय आहेत.

उत्तम, तुझ्या या धाडसी पावलाचे मनापासून कौतुक आणि अभिनंदन!

हा तुझा पहिला अंक असला तरीही तू वृत्तपत्र क्षेत्रात नवीन नाही. तू गेली अनेक वर्षे वृत्तपत्रासाठी काम करत आहेस. हे साप्ताहिक चालवताना हा अनुभव नक्कीच तुझ्या गाठीशी आहे. त्यामुळे तू यशस्वी होशील व वृत्तपत्र क्षेत्रात तुझा दबदबा निर्माण होईल, यात शंकाच नाही.

या साप्ताहिकातून, **"तुझ्या शब्दांना विचारांची साथ लाभो, विचारांना सत्याची धार लाभो, लेखणीला समाजभानाची दिशा लाभो, आणि तुझ्या साप्ताहिकाला वाचकांच्या विश्वासाची साथ लाभो...!"**

तुझ्या लेखणीतून समाजातील विविध प्रश्नांना वाचा मिळो, सकारात्मक विचारांना व्यासपीठ मिळो आणि नव्या पिढीला प्रेरणा देणारे विचार सातत्याने वाचकांपर्यंत पोहोचावेत, हीच मनापासून अपेक्षा.

पहिला अंक म्हणजे केवळ सुरुवात आहे; यापुढील अंक तुझ्या कर्तृत्वाची नवी ओळख ठरो! तुझ्या या नव्या उपक्रमाला उत्तरोत्तर यश, भरभराट आणि व्यापक वाचकवर्ग लाभो, यासाठी मनापासून हार्दिक शुभेच्छा!

खूप खूप अभिनंदन, उत्तम! तुझी लेखणी अशीच अविरत चालत राहो!

तुझा शिक्षक,

- बसवंत थरकार

आयु. उत्तम पवार,

आपण हाती घेतलेल्या या नाविण्यपूर्ण व सेवाभावी उपक्रमासाठी माझ्याकडून तसेच 'सम्यक कोकण कला संस्था, तालुका शाखा गुहागर'च्या वतीने **हार्दिक शुभेच्छा आणि मंगल कामना.**

आकाशी झेप घे रे पाखरा,
ना बंधने मोकळ्या अंबरा
तूच तुझा स्वामी आहेस,
आमुच्या तू कामी आहेस
विहरताना अंबर सारे,
आम्हास केव्हा विसरू नको रे ।।

आपला शुभेच्छुक;

- बी. जी. पवार

अध्यक्ष,
सम्यक कोकण कला संस्था
ता. शाखा गुहागर

शब्दांना दिशा...विचारांना मंच!

कोकणच्या मातीचा गंध, समाजजीवनाची स्पंदने आणि परिवर्तनाची आस आपल्या शब्दांतून वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प घेऊन 'उत्क्रांत कोकण' या साप्ताहिकाची सुरुवात होत आहे, ही आनंदाची आणि स्वागतार्ह बाब आहे.

पत्रकारितेच्या वाटेवर सत्य, निर्भीडता आणि सामाजिक बांधिलकी यांचा दीप तेवत ठेवत 'उत्क्रांत कोकण'ने कोकणच्या प्रश्नांना आणि लोकांच्या आवाजाला प्रभावी मंच मिळवून द्यावा, ही मन:पूर्वक अपेक्षा.

संपादक उत्तम पवार आणि संपूर्ण 'उत्क्रांत कोकण' परिवारास मन:पूर्वक सदिच्छा!

- संजय गमरे

अध्यक्ष,
अपरान्त साहित्य कला प्रबोधिनी,
रत्नागिरी जिल्हा

दीपक भरणकर यांना ‘आदर्श शिक्षक पुरस्कार’

‘ज्ञानदीप’मधून शेकडो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा;

गुहागर (उत्तम पवार): ग्रामीण भागातून आलेल्या एका शिक्षकाने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मुंबईजवळील विरार येथे सुरू केलेल्या शैक्षणिक कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे. राज्यस्तरीय कोचिंग क्लास संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने ‘ज्ञानदीप कोचिंग क्लास’चे संचालक दीपक आनंदी पांडुरंग भरणकर यांना ‘आदर्श शिक्षक पुरस्कार’ जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा २७ सप्टेंबर रोजी पुणे येथे पार पडणार आहे.

सन २०१७ मध्ये ज्ञानदीप कोचिंग क्लासची स्थापना करण्यात आली. मोठमोठ्या क्लासेसशी स्पर्धा करताना आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या आव्हानात्मक परिस्थितीचा सामना करावा लागला. मात्र, परिस्थितीसमोर हार न मानता विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीला केंद्रस्थानी ठेवून भरणकर यांनी आपली शैक्षणिक वाटचाल सुरू ठेवली. बुद्ध, शिव, फुले, शाहू आणि आंबेडकर यांच्या विचारांवर विश्वास ठेवत त्यांनी शिक्षणाला केवळ व्यवसाय न मानता एक सामाजिक सेवा म्हणून कार्य केले.

संघर्षातून घडला शिक्षक

डी.एड. शिक्षण पूर्ण केल्यानंतर कौटुंबिक परिस्थितीमुळे अनेक अडचणी निर्माण झाल्या. काही ठिकाणी संधी हुकल्या; मात्र जिद्द आणि शिक्षणाची ओढ कायम राहिली. त्यानंतर त्यांनी बी.एड.चे शिक्षण पूर्ण केले. विद्यार्थी दशेत असतानाच त्यांना आदर्श विद्यार्थी आणि सर्वोत्तम विद्यार्थी पुरस्कार मिळाले होते. महाविद्यालयीन स्तरावर वक्तृत्व स्पर्धांमध्येही त्यांनी यश मिळविले. लेखन आणि वक्तृत्वाची आवड पुढे त्यांच्या शैक्षणिक कार्यातही उपयोगी ठरली.

कमी फीमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा ध्यास

ज्ञानदीप कोचिंग क्लास सुरू करण्यामागे विद्यार्थ्यांना अतिरिक्त मार्गदर्शन देऊन त्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याचा मुख्य उद्देश होता. आर्थिकदृष्ट्या सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांनाही चांगले शिक्षण मिळावे, यासाठी अत्यल्प शुल्कात मार्गदर्शन करण्यावर भर देण्यात आला.

कमी गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक गुण मिळवून देणे हे ज्ञानदीप क्लासचे प्रमुख उद्दिष्ट राहिले आहे. ५० टक्क्यांच्या आसपास गुण असलेल्या विद्यार्थ्यांना दहावीच्या परीक्षेत ८५ टक्क्यांपर्यंत गुण मिळवून देण्यात यश आल्याचे भरणकर सांगतात. अनुसया विद्यालयातील विविध विषयांमध्ये प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांमध्येही ज्ञानदीप क्लासच्या विद्यार्थ्यांचा समावेश राहिला आहे.

गेल्या काही वर्षांत दहावीच्या परीक्षेत ७५ ते ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय असल्याचेही त्यांनी सांगितले.

शिक्षणापासून दूर गेलेल्या विद्यार्थ्यांनाही दिली नवी दिशा

ज्ञानदीप क्लासच्या कार्यातील विशेष बाब म्हणजे शैक्षणिक प्रवाहातून मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम, शासनाच्या १७ नंबर अर्जाच्या माध्यमातून नववीत नापास झालेले तसेच अर्धवट शिक्षण सोडून दिलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले.

आजपर्यंत अशा २०० हून अधिक विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्याचे काम केल्याचे भरणकर यांनी सांगितले. घरकाम करणाऱ्या मुलींनीही योग्य मार्गदर्शन आणि मेहनतीच्या जोरावर चांगले गुण मिळवून उत्तीर्ण होण्याची उदाहरणे आहेत. एका विद्यार्थिनीने बाहेरून परीक्षा देत इंग्रजी माध्यमातून विज्ञान विषयात ९० गुण मिळविले, तर घरकाम करणाऱ्या एका विद्यार्थिनीने बारावीच्या इंग्रजी माध्यमातील कला शाखेत ६२ टक्के गुण मिळविले. या यशातून ‘आपण कमी आहोत’ असा न्यूनगंड न बाळगता प्रयत्न आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर कोणताही विद्यार्थी चांगले यश मिळवू शकतो, हा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

‘पैसा नव्हे, गुणवंत विद्यार्थी घडविणे हे ध्येय’

पैसा कमावणे हा मुख्य उद्देश नसून समाजात गुणवंत आणि स्पर्धात्मक विद्यार्थी घडविणे हे आपले ध्येय असल्याचे दीपक भरणकर सांगतात. कोरोना काळातील आव्हानांवरही मात करत त्यांनी आपली शैक्षणिक ज्ञानज्योत अखंड सुरू ठेवली. राज्यस्तरावर कार्यरत असलेल्या शैक्षणिक संघटनेने त्यांच्या कार्याची दखल घेत ‘आदर्श शिक्षक पुरस्कार’ जाहीर केल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. या पुरस्कारामुळे नव्या उमेदीने शैक्षणिक कार्य करण्याची प्रेरणा मिळाली असून, या यशामागे पत्नी, बहिणी, भाचे–भाची, हितचिंतक, मार्गदर्शक आणि पाठिराख्यांचा मोठा वाटा असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रतिकूल परिस्थितीतून वाट काढत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला केंद्रस्थानी ठेवून सुरू ठेवलेल्या या शैक्षणिक कार्याची राज्यस्तरावर झालेली दखल म्हणजे दीपक भरणकर यांच्या ज्ञानसाधनेला मिळालेली महत्त्वाची पोचपावती मानली जात आहे.

कोकण आयुक्तांच्या आदेशानंतरही कारवाई नाही; चिवेली ग्रामस्थांची पंचायत समितीवर धडक

चिपळूण (प्रतिनिधी): तालुक्यातील चिवेली येथील राष्ट्रीय पेयजल योजनेतील कथित ३३ लाख रुपयांच्या अपहारप्रकरणी संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश विभागीय कोकण आयुक्तांनी महिनाभरापूर्वी दिले होते. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने संतप्त चिवेली ग्रामस्थांनी चिपळूण पंचायत समितीच्या पाणीपुरवठा विभागात धडक देत कारवाईची मागणी केली. यावेळी पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता दिगंबर पाटील यांनी संबंधितांवर कारवाईची प्रक्रिया सुरू असून, वरिष्ठांचे मार्गदर्शन घेऊन गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिले.

चिवेली येथील राष्ट्रीय पेयजल योजनेबाबत माहिती अधिकार कार्यकर्ते विद्याधर साळुंखे यांनी तक्रार केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने दोन वेळा चौकशी करण्यात आली. त्यामध्ये सुमारे ३३ लाख रुपयांची कामे प्रत्यक्षात न करताच संबंधित ठेकेदाराला रक्कम अदा केल्याचे चौकशीत निदर्शनास आल्याचे सांगण्यात आले.

या प्रकरणी जिल्हा परिषद तसेच कोकण भवन स्तरावर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आली. त्यानंतर विभागीय कोकण आयुक्तांनी पाणी योजनेत सुमारे ३३ लाख रुपयांचा संशयित अपहार झाल्याचे निदर्शनास आल्याने संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले. तसेच संबंधित रक्कमेची वसुली करण्याच्या सूचनाही जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देण्यात आल्या होत्या.

मात्र, आदेश होऊन महिना उलटूनही कारवाई न झाल्याने चिवेली ग्रामस्थ सिद्धेश शिर्के, नीलेश सुर्वे, मोहन गुजर आणि अशोक मोहिते यांनी चिपळूण पंचायत समितीच्या पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता दिगंबर पाटील यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी विभागीय कोकण आयुक्तांच्या आदेशाची माहिती देत पाणी योजनेतील कथित गैरव्यवहारास जबाबदार असलेले तत्कालीन अधिकारी, संबंधित ठेकेदार, पाणीपुरवठा समिती तसेच योजनेच्या खर्चास मान्यता देणाऱ्या समित्यांच्या पदाधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच कथित अपहाराची रक्कम संबंधितांकडून वसूल करण्याची मागणीही केली.

यावर उपअभियंता दिगंबर पाटील यांनी, योजनेस जबाबदार असलेल्या संबंधितांवर कारवाईची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले. जिल्हा परिषदेने याप्रकरणी १७० पानांचा अहवाल तयार केला असून, त्याचे अवलोकन करून तसेच वरिष्ठांचे मार्गदर्शन घेऊन फौजदारी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

जात वैधता प्रमाणपत्राच्या त्रुटींची पूर्तता करण्यासाठी विशेष मोहीम;

२२ व २४ सप्टेंबर रोजी मूळ कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे आवाहन

रत्नागिरी (जिमाका): पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संवैधानिक पदावरील कारकिर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त राज्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत ‘सेवा संकल्प अभियान’ राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत ज्या विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्राचे अर्ज त्रुटींमुळे प्रलंबित आहेत, त्यांनी समिती कार्यालयाशी संपर्क साधून त्रुटींची पूर्तता करावी, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

विशेषत: नीट (NEET), सीईटी (CET), क्लॅट (CLAT), जेईई (JEE) यांसारख्या व्यावसायिक प्रवेश परीक्षा दिलेल्या ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटींमुळे प्रलंबित आहेत, अशा विद्यार्थ्यांसाठी खालीलप्रमाणे विशेष नियोजन करण्यात आले आहे.

त्रुटी पूर्ततेचे दिवस : २२ सप्टेंबर २०२६ आणि २४ सप्टेंबर २०२६.

आवश्यक बाबी : संबंधित विद्यार्थ्यांनी (किंवा त्यांच्या पालकांनी) सर्व मूळ कागदपत्रांसह जिल्हा जात पडताळणी समिती कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहावे.

कालावधी : अन्य सर्व अर्जदारांनाही १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या महिनाभराच्या कालावधीत समिती कार्यालयाशी संपर्क साधून आपल्या अर्जातील त्रुटी दूर करता येतील.

नवीन अर्ज तातडीने करण्याचे आवाहन

बारावीनंतर वैद्यकीय, अभियांत्रिकी व इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी समितीमार्फत शाळा - महाविद्यालयांमध्ये मार्गदर्शन शिबिरे घेऊन प्रत्यक्ष अर्ज स्वीकारले जातात. चालू शैक्षणिक वर्षात ज्या विद्यार्थ्यांनी विविध प्रवेश परीक्षा दिल्या आहेत, परंतु अद्याप जात वैधता पडताळणीसाठी अर्ज केलेला नाही, त्यांनी प्रवेश प्रक्रियेतील अडचण टाळण्यासाठी तात्काळ अर्ज दाखल करावेत, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या संशोधन अधिकाऱ्यांनी केले आहे.

पंचशील हे कार्यक्रमाचा भाग नसून जीवनाचा भाग झाला पाहिजे - संजय गमरे

चिंद्रवळे (वार्ताहर): आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या भिक्खूंच्या वर्षावास कालावधीनिमित्त बौद्धजन सहकारी संघ, तालुका गुहागर अंतर्गत धम्म संस्कार समितीच्या वतीने धम्म संस्कार प्रवचन मालिकेचे आयोजन करण्यात आले. रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी सारनाथ बुद्ध विहार, चिंद्रवळे येथे हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना संजय गमरे यांनी पंचशीलाच्या आचरणाचे महत्त्व स्पष्ट केले. ते म्हणाले, ''पंचशील हे केवळ एखाद्या धार्मिक कार्यक्रमात घेण्यापुरते किंवा सांगण्यापुरते मर्यादित राहता कामा नये. पंचशील हा आपल्या जीवनाचा भाग झाला पाहिजे. आपल्या विचारांत, वाणीमध्ये आणि आचरणामध्ये पंचशील प्रतिबिंबित झाले, तरच धम्माचे खरे संस्कार आपल्या जीवनात रुजतील.''

पंचशीलातील तत्त्वे ही केवळ धार्मिक विधीचा भाग नसून व्यक्तीच्या नैतिक आणि सामाजिक जीवनाला दिशा देणारी आचारसंहिता आहे. त्यामुळे बुद्धांच्या धम्मातील शील, प्रज्ञा आणि करुणा ही मूल्ये दैनंदिन जीवनात आचरणात आणण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

संपूर्ण कार्यक्रम रामचंद्र पांडुरंग पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. कार्यक्रमाला बौद्धजन सहकारी संघाचे अध्यक्ष सुरेश भिकाजी सावंत, सेक्रेटरी सुनील गमरे, माजी विश्वस्त महेंद्र कदम, विभाग अधिकारी सचिन पवार, गुहागर विभागाचे सेक्रेटरी दशरथ पवार, सदस्य सिद्धार्थ गमरे, अनिल गमरे, कमळाकर पवार, मयूर गमरे, संस्कार समितीचे अध्यक्ष शशिकांत जाधव तसेच सदस्य उमेश कदम, चंद्रकांत गमरे, संदीप गमरे, अनामिका कदम, विकास विष्णू पवार, चंद्रकांत जाधव, विकास बाळू पवार, राजेश जाधव,

दीपक पवार, शहानंद पवार, शशिकांत सुर्वे, दत्ताराम कदम, प्रकाश जाधव, बाळकृष्ण जाधव, सुरेश जाधव, नेहा कदम, राजदत्त कदम, यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते व धम्मप्रेमी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमेश कदम यांनी केले, तर आभार प्रदर्शन राजदत्त कदम यांनी केले.

या कार्यक्रमाचे व्यवस्थापन बौद्धजन सहकारी संघ, शीर विभाग क्र. ६, चिंद्रवळे शाखा क्रमांक ५५ (गाव व मुंबई) आणि माता रमाई महिला मंडळ यांच्यावतीने करण्यात आले.

पोषण आहाराच्या दैनंदिन नोंदी ठेवण्याच्या कटकटीतून शिक्षकांची लवकरच सुटका होणार

रत्नागिरी (प्रतिनिधी): हाताने नोंदवह्या भरण्याचे काम बंद करून सर्व प्रक्रिया ऑनलाईन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय प्राथमिक शिक्षण विभागाने घेतला असून यामुळे शालेय पोषण आहाराच्या दैनंदिन नोंदी ठेवण्याच्या कटकटीतून शिक्षकांची लवकरच सुटका होणार आहे. या निर्णयामुळे शिक्षकांवरील अशैक्षणिक कामाचा बोजा कमी होणार आहे.

आतापर्यंत शाळांना मिळणाऱ्या तांदूळ आणि धान्यसाठ्याची नोंद, दैनंदिन खर्च, शिल्लक साठा आणि लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या शिक्षकांना हाताने लिहावी लागत होती. यात बराच वेळ जात होता. हे लक्षात घेऊन शासनाने प्रथम लातूर जिल्ह्यात पायलट प्रोजेक्ट म्हणून ऑनलाईन प्रणाली राबविली. हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर आता ही डिजिटल प्रणाली संपूर्ण महाराष्ट्रात लागू करण्यात येत आहे. या निर्णयामुळे शिक्षकांना आता दररोज नोंदवहीत नोंद करण्याची गरज नाही.

दर महिन्याच्या शेवटी खर्च आणि शिल्लकीचा अहवाल पीडीएफ स्वरूपात उपलब्ध होणार असून, तो प्रिंट करून ठेवल्यास वेगळी नोंदवही ठेवण्याची गरज भासणार नाही. उपस्थिती आणि लाभाची नोंद मोबाईल ॲप, वेबपोर्टल किंवा एसएमएसद्वारे करता येणार आहे. यावर गटशिक्षणाधिकारी आणि शिक्षणाधिकारी नियंत्रण ठेवणार आहेत. नवीन नियमानुसार, शाळांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील आहार वाटपाच्या शेवटच्या दिवसाचा किंवा ३० एप्रिल २०२६ अखेरचा शिल्लक साठा एमडीएम पोर्टलवर ओपनिंग बॅलन्स टॅबमध्ये नोंदवावा लागणार आहे.

ही नोंद इयत्ता पहिली ते पाचवी आणि सहावी ते आठवी अशा दोन गटांत किलो ग्रॅममध्ये करायची आहे. नवीन धान्य मिळाल्यावरही पोर्टलवर नोंद करणे बंधनकारक असणार आहे, असे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले.

'यूपीआय' वरील शुल्कास व्यापाऱ्यांचा विरोध

मुंबई : डिजिटल व्यवहारांसाठी मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या 'यूपीआय' व्यवहारांवर शुल्क आकारण्याच्या वित्त मंत्रालयाच्या विचाराविरोधात व्यापाऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

अगदी कमी प्रमाणात का असेना, पण यूपीआय वर शुल्क आकारणे म्हणजे आधीच आर्थिक संकटात असलेल्या छोट्या व्यावसायिकांवर अतिरिक्त बोजा टाकण्यासारखेच आहे. त्यामुळे यूपीआय व्यवहार हे पूर्णपणे मोफतच असायला हवेत, अशी ठाम भूमिका 'फेडरेशन ऑफ रिटेल ट्रेडर्स वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष वीरेन शाह यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सरकारला या निर्णयाचा पुनर्विचार करण्याचे आवाहन करीत व्यापाऱ्यांची बाजू मांडली आहे.

दोन हजार रुपयांपेक्षा जास्त रक्कमेवर ०.४ टक्के शुल्क आकारण्याचा प्रस्ताव लहान वाटत असला तरी भविष्यात हा कर आणखी वाढण्याची भीती आहे, अशी चिंता शाह यांनी व्यक्त केली आहे.

आंबा, काजू उत्पादकांची नुकसानभरपाई रखडली

रत्नागिरी (प्रतिनिधी): नैसर्गिक आपत्तींमुळे कोकण किनारपट्टीवर आंबा आणि काजू उत्पादकांचे मोठे नुकसान झाले होते. नुकसान भरपाईसाठी शेतकऱ्यांचा वाढता रोष लक्षात घेऊन राज्य सरकारने २०९ कोटी १० लाख रुपयांची मदत जाहीर केली; परंतु शेतकरी ओळख क्रमांक (ॲग्रीस्टॅक नंबर) आणि ई-केवायसी नसल्यामुळे १६१ कोटी रुपयांची रक्कम पडून आहे. कोकणातील सुमारे ८३ हजार शेतकऱ्यांना अद्यापही मदत मिळालेली नाही. यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातीलही शेतकऱ्यांचा समावेश आहे.

गेल्यावर्षी कोकण किनारपट्टीवर अवकाळी पाऊस, हवेतील बाष्प आणि अवेळी पडलेल्या धुक्यामुळे आंबा आणि काजूचा मोहोर कुजून गेला होता. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली कोकण आणि मुंबईत मोर्चा काढण्यात आला. कोकणातील मंत्री, आमदार यांनी मुख्यमंत्र्यांकडे मदतीची मागणी केली होती. राज्याच्या मदत व पुनर्वसन विभागाने अहवालानुसार शेतकऱ्यांना मदत म्हणून २०९ कोटी १० लाख रुपयांच्या निधीला मंजुरी दिली होती. शासननिर्णयानुसार ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यांतील ९२ हजार ३४२ हेक्टरवरील फळबागांच्या नुकसानीपोटी १ लाख ३४ हजार शेतकरी मदतीसाठी पात्र ठरले होते; परंतु २५ जून रोजी निधी उपलब्ध करून देऊनही अद्यापपर्यंत ८३ हजार शेतकऱ्यांना मदत मिळाली नसल्याची बाब समोर आली आहे.

चिपळूण अर्बन को.ऑप.बँकेला 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार'

चिपळूण (प्रतिनिधी): दि चिपळूण अर्बन को.ऑप.बँक लि. चिपळूण ला सन २०२५-२६ सालाकरीता महाराष्ट्र राज्यातून तृतीय क्रमांकाचा 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार' प्राप्त झाला आहे. दि महाराष्ट्र अर्बन को ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशनतर्फे दरवर्षी सहकारी बँकिंग क्षेत्रात उत्तम कामगिरी करणाऱ्या सभासद नागरी सहकारी बँकांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कारांनी सन्मानित करत असते. चिपळूण अर्बन बँकेला सलग दुसऱ्यांदा हा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

दि महाराष्ट्र अर्बन को. ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशनतर्फे दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या या पुरस्कारासाठी सन २०२५-२६ या वर्षाकरीता दि चिपळूण अर्बन को. ऑप.बँक लि. चिपळूण या बँकेस रु.३०१ कोटी ते रु. ५०० कोटी पर्यंत ठेवी असलेल्या बँका या गटामध्ये महाराष्ट्र राज्यामध्ये तृतीय क्रमांकाचा मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. पुरस्कार वितरण समारंभ दि.१२ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २.०० वाजता सुंदरवाडी छत्रपती संभाजी नगर एक्सप्रेस इन हेरिटेज येथे पार पडला.

बँकेचे चेअरमन मोहनशेठ मिरगल, संचालक समीर जनावलकर, रत्नदीप देवळेकर, समीर टाकळे यांनी सदरचा पुरस्कार स्वीकारला. महाराष्ट्र अर्बन को.ऑप.बँक्स फेडरेशनचे अध्यक्ष सीए. अजय ब्रम्हेचा, उपाध्यक्षा वैशाली आव्हाडे, सीईओ प्रसाद पाटील तसेच फेडरेशनचे पदाधिकारी यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला.

रत्नागिरीत 'मिशन फिनिक्स'ची धडक कारवाई; १६ गुन्हे दाखल, २२ आरोपी अटकेत

रत्नागिरी (प्रतिनिधी) : जिल्ह्यातील अंमली पदार्थांची विक्री, बेकायदेशीर साठवणूक, बाळगणे व सेवन करणाऱ्यांविरुद्ध रत्नागिरी पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. पोलीस अधीक्षक नितीन दत्तात्रय बगाटे आणि अपर पोलीस अधीक्षक बी. बी. महामुनी यांच्या मार्गदर्शनाखाली ८ते १४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत 'मिशन फिनिक्स' अंतर्गत ही विशेष मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अंमली पदार्थांशी संबंधित एकूण १६ गुन्हे दाखल करण्यात आले. त्यापैकी अंमली पदार्थ सेवनाचे १०, तर अंमली पदार्थ बाळगल्याचे ६ गुन्हे आहेत. या कारवाईत एकूण २२ आरोपींना अटक करण्यात आली.

पोलिसांनी केलेल्या कारवाई दरम्यान ७७ हजार रुपये किमतीचे ५.१५ ग्रॅम ब्राऊन हेरॉईनसदृश पदार्थ तसेच १ लाख २५ हजार २०० रुपये किमतीचा २.५११ किलो गांजा जप्त केला. या कारवाईत एकूण २ लाख २ हजार २०० रुपये किमतीचा अंमली पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला आहे.

अंमली पदार्थांची अवैध विक्री व तस्करी करणारे तसेच त्यांचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध यापुढेही कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, युवक आणि समाजाला अंमली पदार्थांच्या विळख्यापासून दूर ठेवण्यासाठी 'मिशन फिनिक्स'अंतर्गत प्रतिबंधात्मक कारवाईसोबतच जनजागृतीपर उपक्रमही राबविण्यात येत आहेत.

जिल्ह्यात अंमली पदार्थांची विक्री, वाहतूक, साठवणूक किंवा सेवनाबाबत कोणतीही माहिती नागरिकांना मिळाल्यास त्यांनी ती तातडीने जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी. तसेच रत्नागिरी पोलीस दलाच्या 'मरत्नसेतू' चॅटबॉट क्रमांक ९३७१४१५६१२ वर ही माहिती कळवावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांनी केले आहे.

२६ वर्षांपासून वेतनाच्या प्रतीक्षेत शिक्षक;

२१ सप्टेंबरपासून आझाद मैदानावर निर्धार आंदोलन

देवरुख (प्रतिनिधी) : राज्यातील विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शिक्षकांच्या प्रलंबित वेतनाचा प्रश्न तब्बल २६ वर्षांनंतरही कायम आहे. शासनाने जुलै महिन्यात दिलेल्या आश्वासनाची दोन महिने उलटूनही अंमलबजावणी न झाल्याने शिक्षकांमध्ये नाराजी वाढली आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षक समन्वय संघाने २१ सप्टेंबरपासून मुंबईतील आझाद मैदानावर निर्धार आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे.

जुलै महिन्यात आझाद मैदानावर शिक्षकांनी आंदोलन केले होते. त्यावेळी शासनाच्या वतीने मंत्र्यांनी मध्यस्थी करून मार्च २०२७ पासून वाढीव वेतन अनुदानाचा टप्पा देण्याचे आश्वासन दिले होते. तसेच अधिवेशन संपल्यानंतर या निर्णयाची कार्यवाही सुरू करण्यात येईल आणि अन्य मागण्यांवर १५ दिवसांत बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले होते. या आश्वासनानंतर शिक्षकांनी आंदोलन स्थगित केले होते.

मात्र, दोन महिने उलटूनही शालेय शिक्षण विभागाकडून अपेक्षित कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप शिक्षक समन्वय संघाने केला आहे. त्यामुळे शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी असून, शासनाच्या आश्वासनाच्या अंमलबजावणीसाठी पुन्हा एकदा आंदोलनाचे हत्यार उपसण्यात आले आहे.

या आंदोलनासंदर्भात शिक्षक समन्वय संघाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार तसेच शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना निवेदने पाठवून आपल्या प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधले आहे.

संघाच्या प्रमुख मागण्यांमध्ये अंशत: अनुदानित शाळांना दरवर्षी नैसर्गिकरीत्या २० टक्के अनुदानाचा टप्पा वाढ देणे, त्रुटीपूर्तता केलेल्या शाळांना समान टप्पा लागू करणे आणि पटसंख्येच्या अटीमुळे अपात्र ठरलेल्या शाळांसाठी पुढील वर्षाची पटसंख्या ग्राह्य धरणे यांचा समावेश आहे. तसेच निवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन सुरू करावे आणि उच्च माध्यमिक शाळांच्या संचमान्यतेसाठी पूर्वीचेच निकष कायम ठेवावेत, अशीही संघाची मागणी आहे.

कायम विनाअनुदानितपासून अंशत: अनुदानितपर्यंतचा प्रवास करताना पाव शतकाहून अधिक काळ उलटला असतानाही अनेक शाळा अद्याप १०० टक्के वेतन अनुदानापासून वंचित असल्याचे शिक्षक संघाचे म्हणणे आहे. आपल्या हक्काच्या वेतनासाठी शिक्षकांना वारंवार आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागत असल्याने या प्रश्नाकडे शासनाने गांभीर्याने पाहण्याची मागणी होत आहे.

दरम्यान, २१ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या निर्धार आंदोलनाची राज्यभरात तयारी सुरू असून, प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागातील हजारो शिक्षक मुंबईतील आझाद मैदानावर सहभागी होणार असल्याचे शिक्षक समन्वय संघाने सांगितले आहे.

साप्ताहिक ' उत्क्रांत कोकण' प्रकाशनाची छायाचित्रे

साप्ताहिक 'उत्क्रांत कोकण' च्या प्रकाशनावेळी उपस्थित –गुहागर तालुक्याचे खंबीर नेतृत्व मा. सुरेश (दादा) सावंत, सा. गुहागर टाइम्स चे संपादक मा. निसारखान सरगुरो, पत्रकार मा. दिनेश चव्हाण, मासिक सम्मासम्बुद्ध चे संपादक मा. संजय गमरे आदी मान्यवर.

साप्ताहिक उत्क्रांत कोकण हे वृत्तपत्र मालक, प्रकाशक, संपादक **श्री. उत्तम रामचंद्र पवार** यांनी धनश्री ऑफसेट, कुवारबाव, रत्नागिरी, ता. जि. रत्नागिरी (महाराष्ट्र) येथे छापून ४५१, श्री. आर. के. निवास तळवली, ता. गुहागर, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले आहे. **मुख्य कार्यालय:** ४५१, आर.के.निवास तळवली (बौद्धवाडी), ता. गुहागर, जि. रत्नागिरी (महाराष्ट्र) - ४१५ ७१९. **संपर्क: 8888770776.**
ई-मेल : pawaruttam44@gmail.com. या अंकात प्रसिद्ध झालेल्या **'लेख'** व **'वाचकांची पत्रे'** यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. **(न्यायकक्षेचे अधिन).**